# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४००००५
दूरध्वनी : ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्स : २२१६३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in
संकेत-स्थळ : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

**प्रकरण क्र. १३७/२०१६**

## जाहीर सूचना

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठीच्या अर्जावर अभिप्राय मागविण्याबाबत**

१. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड-पारेषण (टीपीसी-पारेषण) यांना पारेषण परवाना मंजूर करण्यात आल्यानंतर, त्यांनी नव्याने सुरु केलेल्या पारेषण वाहिन्या/बेज, सेवेतून काढून घेतलेल्या पारेषण वाहिन्या/बेज आणि फेरबदल केलेल्या पारेषण वाहिन्या/बेज, यामुळे मत्तांच्या स्थितीत झालेल्या बदलानुसार सन २०१४ च्या पारेषण परवाना क्र. १ मध्ये सुधारणा करण्यासाठी, टीपीसी-पारेषणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (आयोग) अर्ज सादर केला आहे.

२. पारेषण वाहिन्यांमध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणा खालीलप्रमाणे आहेत –

- पारेषण वाहिन्या सुरु झाल्यानंतर ''प्रस्तावित – पारेषण वाहिन्यांच्या यादी''मधून वगळून त्या पारेषण वाहिन्यांचा पारेषण परवान्यातील ''विद्यमान पारेषण वाहिन्यां''मध्ये समावेश करणे
- सेवेतून काढून घेतलेल्या पारेषण वाहिन्या ''विद्यमान पारेषण वाहिन्यां''मधून वगळणे
- ''विद्यमान पारेषण वाहिन्यां''मधील पारेषण वाहिन्यांच्या नावात बदल करणे

३. पारेषण बेजमधील प्रस्तावित सुधारणा खालीलप्रमाणे आहेत –

- मंजूर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (डीपीआर) बेजची भर घालणे
- अस्तित्वात असलेल्या परंतु पारेषण परवान्यात उल्लेख करावयाच्या राहून गेलेल्या बेजची भर घालणे
- पारेषण परवान्यामध्ये अनवधानाने विचारात घेण्यात आलेले बेज काढून टाकणे
- पारेषण बेज सेवेतून काढून टाकणे
- बेजची तांत्रिक वैशिष्ट्ये/नामकरणामध्ये चूक असणे

४. टीपीसी-पारेषणने, अधिनियमाच्या कलम १८(२)(अ) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार, लेखी सूचना व हरकती मागविण्यासाठी (१) इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी), (२) फायनान्शिअल एक्सप्रेस (इंग्रजी), (३) लोकसत्ता (मराठी) आणि (४) सामना (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी जाहीर सूचना प्रसिध्द केली होती. त्यावर एक हरकत प्राप्त झाली होती व त्यास टीपीसी-

पारेषणकडून उत्तर देण्यात आले आहे. टीपीसी-पारेषणने अर्जात दाखल केलेल्या त्यांच्या अतिरिक्त निवेदनांवर लेखी सूचना व हरकती मागविण्यासाठी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी (१) इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी), (२) फायनान्शिअल एक्सप्रेस (इंग्रजी), (३) लोकसत्ता (मराठी) आणि (४) सामना (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये दुसरी जाहीर सूचना प्रसिध्द केली. या जाहीर सूचनेवर कोणतीही प्रतिक्रिया प्राप्त झाली नाही.

५. राज्य पारेषण कंपनीने त्यांच्या दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजीच्या निवेदनाद्वारे संयुक्त पडताळणी अहवाल सादर केला, ज्यामध्ये राज्य पारेषण कंपनीने वेगवेगळ्या रिसिव्हींग केंद्रांमधील पारेषण बेजसाठी टीपीसी-पारेषणने केलेल्या निवेदनांची पडताळणी केली आहे.

६. आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, टीपीसी-पारेषणने एचपीसीएल आणि बीएआरसी ११० केव्ही फिडर्सच्या संबंधात मागणी केलेल्या सुधारणांचा अपवाद वगळता, विद्युत अधिनियम, २००३ आणि विनियमांमध्ये घालून देण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून टीपीसी-पारेषणला मंजूर करण्यात आलेल्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये सुधारणा करता येईल.

७. टीपीसी-पारेषणच्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह, आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत-स्थळांवर किंवा आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

८. प्रस्तावित सुधारणांवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीत, (६+१) प्रतींमध्ये, ही सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत, आयोगाचे सचिव यांना व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेलद्वारा (फॅक्सः०२२-२२१६३९७६, ई-मेलः mercindia@merc.gov.in) पाठवाव्यात आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, उल्लेख करावा. कोणत्याही संस्थेच्या किंवा कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या वतीने प्रतिक्रिया दाखल करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे. सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीस सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास त्यात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा म्हणजे अशा व्यक्तीस, **मंगळवार, दि. २४ जुलै, २०१८ रोजी १०.०० वाजता, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५ येथील आयोगाच्या कार्यालयात** होणाऱ्या सुनावणीच्या वेळी, जेव्हा टीपीसी-पारेषणच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्याबाबतचा अर्ज विचारात घेण्यात येईल तेव्हा, आपले म्हणणे आयोगापुढे मांडण्याची संधी देण्यात येईल. त्यासाठी वेगळी नोटीस पाठविण्यात येणार नाही.

दिनांक : जून, २०१८
ठिकाण : मुंबई

सचिव, मविनिआ